१९. आळंदी ते पंढरपूर

श्रीक्षेत्र आळंदी हे, अखंडसमाधिनिवासी श्रीज्ञानराजमाऊलीचे निवासस्थान असून श्रीक्षेत्र पंढरपूर हे साक्षात् सच्चिदानंद पूर्णब्रह्म व प्रेमळ भक्तांची माऊली पंढरीनाथ ह्यांचे निवासस्थान होय. श्रीक्षेत्र आळंदीहून श्रीज्ञानराज माऊली पालखीतून बसून पांडुरंगरायाच्या भेटीची उत्कंठा धरून निघाली असता हजारों प्रेमळ वारकरीही जेव्हा माऊलीबरोबर श्रीमंतांच्या भेटीच्या उत्कंठेने निघतात तेव्हा तो संतसमाज एकदा तरी डोळे भरून पाहण्याजोगा अपूर्व असतो. जन्माला येऊन तो सोहळा ज्यांनी एकदा तरी पाहिला असेल त्यांच्याच डोळ्यांचे सार्थक झाले असे वाटल्यावाचून राहत नाही. हाती टाळ, विणा, पताका व तुळशीची वृंदावने घेऊन, भगवन्नामस्मरणाच्या घोषात देहभान विसरून रंगलेले व प्रेमाने नाचत बागडत चाललेले प्रेमळ वारकरी जे पाहतात तेही घटकाभर तो सोहळा पाहत असतात देहभान विसरून ब्रह्मानंदात तल्लीन होतात. भक्तिमार्ग हा अनादि वैदिक असून वेदकाळापासूनच प्रवृत्त झाला असला तरी मधून मधून त्याच्यावर येणारे मालिन्य नाहिसे करून त्याला उजाळा देण्याचे काम भक्तश्रेष्ठ करीत असतात. पंढरीरायाच्या वारीची श्रीज्ञानराजमाऊलीने केलेली स्थापना हा भक्तिमार्गाला असाच एक उजाळा होय. ज्याप्रमाणे पर्वत फोडून महागंगा उगम पावते व समुद्राला मिळण्याला जाताना मध्ये भेटतील त्या लहान नद्यांचेही पाणी घेत व आपला ओघप्रवाह विस्तीर्ण करीत ती महागंगा दुथड वाहत जाते; त्याप्रमाणेच पंढरीरायाच्या भेटीच्या उत्कंठेने श्रीमाऊलीसह मार्गस्थ झालेला प्रेमळ वारकरी संतसमाज पाहिला असता असे वाटते की, श्री ज्ञानराजमाऊलीच्या हृदयातून निघालेल्या प्रेमभक्तिगंगेला सर्व वारकरी संताच्या प्रेमभक्तिनद्या मिळून ही प्रेमाने माजलेली प्रेमभक्तिगंगा मूर्तिमान होऊन प्रेमसागर पंढरीरायाच्या चरणदर्शनाकरिता उत्तुंग वाहत चाललेली आहे.

भगवान् जेथे असतो त्या प्रदेशाला वैकुंठ म्हणतात आणि जेथे नामघोष होत असतो तेथे भगवान् राहतात. आळंदीत परब्रह्ममूर्ति श्रीज्ञानराजमाऊली असल्यामुळे आळंदी हे वैकुंठस्थान होय व पंढरीत परब्रह्ममूर्ति पंढरीराय असल्यामुळे पंढरी देखील भूवैकुंठच होय. आळंदीपासून पंढरीपर्यंत 'रामकृष्णहरी'

नामघोषाने व साक्षात् परब्रह्ममूर्ति श्रीज्ञानराजमाऊलीच्या सन्निध्याने या सोहळ्यात आळंदीपासून ते पंढरपूरपर्यंतचा संबंध प्रदेशच वैकुंठभुवन होऊन जातो, हा प्रेमळभाविकांचा अनुभव आहे. अर्थवाद नव्हे. ज्या अशा सोहळ्यात प्रेमळ वारकरीसमाजाला उघड ब्रह्मानंद भोगण्याचा अलभ्य लाभ घडतो त्या सोहळ्याचे वर्णन कितीही केले तरी अपुरेच होते.

भक्तिगंगेचे स्वरूप

संतांनी प्रवृत्त केलेल्या भक्तीचे स्वरूप,

सात्वस्मिन् परमप्रेमरूपा ।

सगुण साकार श्रीहरीचे ठिकाणी परम प्रेम असणे हे आहे. सर्व जीवांचे ठिकाणी आत्मप्रेम आहे. तसेच आत्मप्रेम, सगुणाचे जडणे याला सर्व संतांनी भक्ती हे नाव दिले आहे. आपण आपले सारखे अखंड प्रेम करीत असतो. पण आपल्याला प्रेम करण्याची जाणीव उत्पन्न होत नाही इतके ते स्वाभाविक, निःस्वार्थी, हेतुरहित होत असते. इतके प्रेम होत असतानाही, जसे गंगेचे वाहणे कधी बंद पडत नाही, त्याप्रमाणे आपली प्रेमाची तळमळ बंद पडत नाही. या तळमळीलाच प्रेम म्हणतात. समाधान वाटणे किंवा सुख होणे याला परमप्रेम म्हणत नाहीत. सुख (लेख.०४-पा.२६२) झालें किंवा समाधान वाटले की, ते भोक्तृत्व होते. भोक्तृत्वात सुखाचा भोग घेणारा अहंकार असतो. सुखस्वरूपभूत असलेला जीव या भोक्तृत्वाहंकारामुळे सुखाहून भिन्न पडतो.

परी ते वेगळेपणे भोगिजे । जैसे पक्षिये फळ चुंबिजे ॥

परमप्रेमात भोक्तेपणही विसरले जाते,

तैसे नव्हे तेथ विसरिजे । भोक्तेपणहि ॥ (ज्ञाने.अ.५.ओ.१३१)

या भक्तिरूप परमप्रेमात,

अदृष्टे दर्शनोत्कंठा दृष्टे विश्लेषभिरुता ।

प्रथम परमेश्वराच्या दर्शनाची तळमळ असते व परमेश्वराचे दर्शन झाले असता परमेश्वराच्या दर्शनाने समाधान किंवा सुख होण्यापूर्वीच म्हणजे समाधान न होताच आता परमेश्वराचा विसर पडू नये किंवा परमेश्वर दृष्टिआड होऊ नये असे वाटते व त्या करिता सारखे चित्त तळमळते.

आवडे हे रूप गोजिरे सगुण । पाहता लोचन सुखावले ॥

आतां दृष्टिपुढे ऐसाचि तूं राही । जो मी तुज पाही पांडुरंगा ॥

या अभंगात तुकाराममहाराजांनी वरील श्लोकातील प्रेमाचे स्वरूपच व्यक्त केले आहे. सारांश, अखंड कोणत्या ना कोणत्या भावाने भगवंताविषयी अखंड जी चित्ताची तळमळ तिला परमप्रेम किंवा भक्तिगंगा म्हणतात.

असे प्रेम ज्ञानोत्तरच

सगुण भगवंताचे आत्मवत् स्वाभाविक प्रेम होण्याकरिता आत्मा व सगुण श्रीहरी एकच आहेत असे अद्वैत ज्ञान होणे जरूर आहे. आत्मा व परमात्मा एक आहे असे दृढ ज्ञान होणे याला ज्ञाननिष्ठा म्हणतात.

ही ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे । तेथ माझी भक्ति उल्लासे ।

स्वाभाविक जे भक्तिप्रेम ते जीवेश्वरैक्यानंतर स्वाभाविकपणेच सगुणश्रीहरीचे ठिकाणी बसते असे माऊलीचे म्हणणे आहे.

एक समस्या

सगुणसाकार श्रीहरीचे स्वाभाविक आत्मप्रेमवत् प्रेम म्हणजे भक्ती असली तरी ती होणे कसे शक्य आहे ? सगुणश्रीहरी मायिक, नाशिवंत व जगाप्रमाणे तुच्छ असल्यामुळे त्या सगुण श्रीहरीचे तसे परमप्रेम लागणे कसे शक्य आहे अशी समस्या कित्येक विद्वान् उत्पन्न करितात व बहुतेक ज्ञान्यांनाही तसे वाटते. ज्ञानपूर्व भक्तीचा सर्व पुरस्कार करितात, पण ज्ञानोत्तर भक्तीचीच आवश्यकता व शक्यता पुष्कळांना पटत नाही.

ज्ञानोत्तर सगुण भक्ती सर्व संतांनी केली आहे

श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीतुकाराममहाराज, श्रीएकनाथमहाराज इत्यादी सर्व संत मंडळी पूर्ण साक्षात्कारी व ज्ञानी असून त्यांनी सगुण श्रीहरीची भक्ती केली आहे व प्रतिपादिली. श्रीपांडुरंगाच्या भेटीकरिता तुकाराममहाराज,

जीवना वेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥

पाण्यातून काढलेल्या मासोळीप्रमाणे तळमळत होते, आणि

अद्वैती तो नाही माझे समाधान । देवभक्तपण गोड वाटे ॥

असे त्यांनी अद्वैतज्ञान झाल्यावरही उद्गार काढलेले आहेत.

माझ्या जीवीची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ।

कारण गोविंदाचे गुणी वेधले व जागृती, स्वप्न सुषुप्ती या तिन्ही अवस्थांचा सगुण

प्रेमाचे विसर पडला असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

भेद तवं तवं दूण अभेदासी ।

भक्तीच्या द्वैताभासात अद्वैतच दुप्पट जोराने वाढते असेही त्यांचे म्हणणे आहे. कारण-

कोणी एक अकृत्रिम । भक्तीचे हे वर्म ।

योगज्ञानादिविश्राम । भूमिका हे ॥

सगुणश्रीहरीच्या या स्वाभाविक आत्मप्रेमवत् परमप्रेमभक्तीत योगज्ञानादि भूमिकेवर असणारे कोणतेही वृत्तिरूप सविकल्प अनुभव विराम पावतात. स्थायिक म्हणून ज्ञानाने तुच्छ वाटणाऱ्या जगातील त्रिगुणात्मक सगुणसाकार पदार्थासारखेच सगुणश्रीहरीचे स्वरूप मायिक व ज्ञानाने मिथ्या वाटणारे असते तर श्रीज्ञानेश्वरादि ज्ञानी संतांचे श्रीपांडुरंगाचे चरणी इतके प्रेम जडले असते का, हा विचाराचा प्रश्न आहे. श्रीज्ञानेश्वरादी सर्व संतांचा असा अनुभव आहे की,

''श्रीकृष्ण देहो सच्चिदानंदघन'' आहे (नाथ भा. अ. २-२८)

जें उन्मनियेचे लावण्य । जें तूर्येचे तारुण्य ।

अनादि जें अगण्य । परमतत्व ॥

'जे आनंदाचे केवळ चैतन्य गा' ती (च) ही **'चतुर्भुज कोंभेली'** सगुणश्रीहरीची साकार मूर्ति होय (ज्ञाने. अ. ६-३२०-३२४)

तरी पार्था परियेसा । मी तव येथ ऐसा ।

रत्नी किळावो जैसा । रत्नचि तो ॥ (ज्ञाने. अ. १४-३७४)

हे सर्व विचार वेदान्तशास्त्रसिद्ध आहेत. म्हणून संतांनी केलेली ज्ञानोत्तर भक्ती ही काही लोकसंग्रहाकरिता नव्हे, किंवा ज्ञानपूर्व स्थितीतील भक्ती, ज्ञानोत्तर भूमिकेवर राहून जाते, अशा पैकीही नव्हे. ही भक्ती म्हणजे सत्य वस्तूवरील सत्य प्रेम होय.

विशुद्धं ज्ञानमुत्पन्नं यस्य तस्य महात्मनः ।

शिवलिंगस्य पूजायां शिवस्थानेषु सुव्रताः ।

प्रियबुद्धिः प्रजायेत स्वभावादेव सर्वदा ॥

सूतसंहिता यज्ञवैभवखंड अ.२

ज्यांना शुद्ध निरुपाधिक आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले असते त्या ज्ञान्यांना

सगुणश्रीहरीचे ठिकाणी स्वाभाविकच परमप्रेम होऊ लागते, असे वेदान्ताचे म्हणणे आहे. किंबहुना ज्ञानानंतरही सगुण श्रीहरीचे प्रेम असणे ही ज्ञानाच्या पूर्णतेची कसोटी होय.

सहजस्थिति व अमृतानुभव

जीवाला जी शेवटली स्थिति प्राप्त करून घ्यावयाची आहे ती परमानंदरूप, जाणीव वृत्तिरहित निर्विकल्प व अनिर्वाच्य आहे, असे सर्व वेदान्तात सांगितले आहे, तेथे प्रमाणांचा शिरकाव नाही, अनुभव आपले अंग मिरवू शकत नाही किंबहुना कोणती जाणीवच उठत नाही. तेथे 'नाही आहे' या दोन्ही प्रत्ययांचा अस्त आहे. कोणत्याही संबंधाचा संबंध नाही. अशी ती स्वयंसिद्ध, निर्विकल्प, सच्चिदानंद प्रत्ययाविरहित सच्चिदानंद स्थिती आहे. ही अखंड परमानंदरूप स्थिती आहे. या स्थितीतील अखंड परमानंदामुळे, जाणीवच स्फुरत नाही व त्या आनंदात किंवा प्रेमात, सच्चित् हे प्रत्यय आनंदाशी समरस होऊन जाऊन केवळ एक अविच्छिन्न आनंद किंवा प्रेमच राहते. समुद्रात मिळाल्यावर भिन्न भिन्न नद्यांचे पाणी जसे अलग अलग दिसत नाही, त्याप्रमाणे या प्रेमसागरातही योगज्ञानादी भूमिका निराळ्या भासत नाहीत, विरून जातात.

हीच जीवाची सहजावस्था आहे, ती त्याला प्राप्त करून देण्याचा वेदान्तशास्त्राधारे आत्मविचार करणे हा ज्ञानमार्ग सांगितला असला तरी तो अपुरा पडतो. जीवाला त्याची परमप्रेमरूप भक्तीची सहजावस्था प्राप्त करून देण्याकरिता ज्ञानमार्ग कसा अपुरा पडतो व निर्गुणाप्रमाणे सगुणही कसे शुद्ध निरुपाधिक आहे व म्हणूनच त्याला ज्ञानोत्तरकाळी परमप्रेमाचा विषय करून सर्व व्यवहार किंवा संसार, त्याच्या साह्याने (लेख.०४-पा.२६६) कसा अखंड सुखाने भरलेला करून सोडता येतो किंवा ब्रह्मानंदाने भरलेला अनुभविता येतो, हे या अमृतानुभव ग्रंथात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितले आहे. अर्थात मी ब्रह्म आहे असा अनुभव असलेला ज्ञानी या ग्रंथाचा अधिकारी असून व्यापक ब्रह्मानंद प्राप्ती किंवा अखंडानंद प्राप्ती हे या ग्रंथाचे प्रयोजन आहे.

एक प्रवाद

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिल्यावर श्रीनिवृत्तिनाथांना दाखविला; पण त्यांनी तो पाहून त्रासमुद्रा दाखविली. कारण अज्ञान स्वीकारून

ज्ञानेश्वरीत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जगाची उपपत्ति लाविली हे पाहून निवृत्तिनाथांना बरे वाटले नाही. हे पाहून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अमृतानुभव ग्रंथ रचला व त्यात त्यांनी शंकराचार्यांना पूर्वपक्षात घेऊन व त्यांच्या अज्ञानाचे खंडन करून जगाची उपपत्ती लावून दाखविली. अमृतानुभव ग्रंथ पाहून श्रीनिवृत्तिनाथ प्रसन्न झाले असा एक प्रवाद आहे. पण यात काही तथ्य दिसत नाही. कारण संपूर्ण ज्ञानेश्वरी ग्रंथ श्रीनिवृत्तिनाथांच्या समोर व त्यांच्या आज्ञेने झाला हे ज्ञानेश्वरीवरूनच दिसते. तेव्हा तो ग्रंथ पुनः श्रीनिवृत्तिनाथांना दाखविण्याचा व तो पाहून त्यांची त्रासमुद्रा होण्याचा संभवच कसा, हे समजत नाही. आचार्यांच्या अद्वैतमताहून भिन्न अशा माध्व, रामानुज इत्यादी जगाला सत्य मानणाऱ्या कोणत्या तरी मताचा अनुयायी असणाऱ्या व शंकराचार्यांचा द्वेष करणाऱ्या कोणत्या तरी गृहस्थाने हा प्रवाद सुरू केलेला दिसतो. शंकराचार्यांनी जड, विनाशी रूपाने प्रत्ययाला येणाऱ्या जगाची उपपत्ती लावताना अज्ञानाचा स्वीकार केला आहे; कारण तसे जड सच्चिदानंद ब्रह्मापासून होणेच शक्य नाही. तोही स्वीकार त्यांनी स्वतःच्या दृष्टीने केला नसून जीवाने आपल्या ठिकाणी अज्ञानाची कल्पना करून घेतल्यामुळे त्याला जग, जड विनाशी दिसते असे त्यांचे म्हणणे आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी अमृतानुभव ग्रंथात अज्ञानाचे खंडण करून ज्या जगताची उपपत्ती लाविली ते जगत् जड, विनाशी नाही, तर सच्चिदानंदस्वरूप किंवा चिद्विलासरूप आहे. ज्ञानदृष्टीने माया नाही, विद्या नाही, जड जग नाही, व ते विनाशी नाही. जग चिद्विलास आहे असे श्रीज्ञानेश्वर महाराजांचे जसे म्हणणे आहे, तसेच शंकराचार्यांचेही म्हणणे आहे म्हणून अमृतानुभव ग्रंथात शंकराचार्यांच्या मताला पूर्वपक्षात घेतले म्हणणे म्हणजे आपले शंकराचार्यांच्या वेदान्ताविषयी जसे पूर्ण अज्ञान दाखविणे होय, तसे त्यांना निष्कारण घोर अन्याय करणारे होय. या अशा प्रकारच्या करण्यात त्यांच्याविषयी द्वेषच दिसून येतो. हा प्रवाद खराच मानायचा असल्यास अमृतानुभवातील प्रतिपादनाशी सुसंगत असा त्याचा एकच अर्थ होऊ शकतो. नाथसंप्रदाय हा भक्तीचा पुरस्कार करणारा व सगुण श्रीहरीचे स्वरूपही निरुपाधिकच आहे असे अनुभवसिद्ध मानणारा पंथ आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीत, अज्ञानी जीवांना बोध करताना त्यांच्या अज्ञान निरासावर व अज्ञानजन्य त्रिगुणात्मक

सगुणाच्या निरासावर, प्राधान्याने जोर दिला असल्यामुळे, अज्ञानरहित निरुपाधिक असेहि सगुण आहे असा साधकाला काही ज्ञानेश्वरीवरून चटकन् बोध होत नाही व ज्ञानोत्तर भक्तिसिद्धीकरिता तर अशा निरूपाधिक सगुणाच्या सिद्धीची आवश्यकता आहे. तेव्हा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या निर्मितीवरच न थांबता सगुणसाकार श्रीहरीही कसा निरूपाधिक आहे हा संप्रदायातील स्वानुभव सांगणारा ग्रंथ लिहिला. असे निवृत्तिनाथांनी त्रासमुद्रेने सुचित केले. नाथसंप्रदायात जो कुंडिलिनी योग सांगितला आहे त्याच्या साह्याने सगुण श्रीहरीचे स्वरूप कसे निरुपाधिक आहे व सगुणनिर्गुण यांचे कसे ऐक्य आहे याचा प्रत्यक्ष अनुभव येतो, हेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीतील सहाव्या अध्यायांत -

''जे उन्मनियेचें लावण्य'' येथून ''एवं पार्था जे निजस्वरूप माझे''

येथपर्यंत अनिर्वाच्य निर्गुण स्वरूपाचे वर्णन करून ''ते हे चतुर्भुज कोंभेली'' या ओवीने ते निर्गुणच मायेवाचून चतुर्भुज सगुण साकार झाले असे स्वानुभवाने सांगितले आहे.

अनुभवामृतातील विवेचन

श्रीज्ञानेश्वरमाऊलीनी अनुभवामृतात जे आत्मस्वरूपाचे विवेचन केले आहे ते सर्व ज्ञानदृष्टीने केले आहे व ज्या विचारपद्धतीने ज्ञानी पुरुष आपल्या मूळच्या स्वाभाविक निर्विकल्प अनिर्वाच्य अखंड प्रेमरूप सहजावस्थेला पोहचतो त्या विचारपद्धतीचा स्वानुभवजन्य आविष्कार केला आहे. तेथे शंकराचार्यांच्या मताचे खंडन नसून उलट आचार्यमताचा स्वीकार आहे व सांख्य, मीमांसा, वल्लभ, शैवप्रत्यभिज्ञा इत्यादी मतात मानलेल्या भावरूप अज्ञानाचे खंडन आहे. शंकराचार्य अज्ञान ही जीवाची नुसती कल्पना आहे असे जे म्हणतात तेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ठरविले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे अनुभवामृतातील संपूर्ण विचार, सूतसंहिता, बृहदारण्यकभाष्य इत्यादी ग्रंथांतून प्रतिपादिले आहेत. अनुभवामृत हा ग्रंथ अनुभवावर रचला असल्यामुळे आपल्या ठिकाणींच श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या विचारांचा पडताळा पाहणे योग्य होणार आहे.

अनुभवामृताच्या पहिल्या प्रकरणात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जगद्भासाला कारणीभूत होणाऱ्या शिवशक्तीचे वर्णन केले आहे. शिव म्हणजे आत्मा व शक्ति म्हणजे मी स्फुरण. आपल्याही ठिकाणी एक आत्मा आहे व तोच 'मी' म्हणून स्फुरत असतो. तेथे दुसरी वस्तुच नाही. पण मी हा आत्माच आहे असे न समजता मी म्हणून आपण कोणी स्वतंत्र देहधारी आहो असे समजून आपण आपले स्वतंत्र अस्तित्व व वस्तुत्व वागवितो. या समजुतीत आपण आत्म्याचे अस्तित्व व वस्तुत्व विसरतो व आपले स्वतंत्र वस्तुत्व व अस्तित्व मानतो. येथून द्वैताची सुरुवात होते. अद्वैत आत्मस्वरूपाला विसरून सुरू झालेली द्वैत कल्पना, वाढत जाऊन ती नाना प्रकारची होते. त्यालाच जग किंवा प्रपंच असे आपण म्हणतो. अशा प्रकारच्या द्वैत कल्पनेला चिकटून असणे याला वेदान्तात जीवदशा म्हणतात, ही जीवदशा प्रथम असते. हे शंकराचार्यादी वेदान्त्याचे म्हणणे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी या ग्रंथातही मानिले आहे. वास्तविक पाहता आत्मा व मी स्फुरण याचा दोनपणा दिसत असला तरी त्यांच्या एक अस्तित्वामुळे त्यांचे स्वाभाविक जे ऐक्य आहे ते न मोडता शिवशक्ती किंवा आत्मा व मी स्फुरण, असे दोनपण स्फुरते, हे दोनपण सत्य नव्हे - म्हणजे मूळचे एकपण नाहिसे होऊन दोनपण येते असे नव्हे असो.

जया एका सत्तेचे बैसणे । दोघा एका प्रकाशाचे लेणें ।
जे अनादि एकपणें । नांदती दोघे ।

इत्यादि अनेक ओव्यांनी श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी प्रतिपादिले आहे व शेवटी

अहं देऊनी शंभु । शांभवी झालो ।

मी शिवाला अहं म्हणजे मीपण समर्पण करून शांभवी होऊन राहिलो - म्हणजे केवळ शक्तिस्वरूप होऊन राहलो - असे माऊली म्हणते.

पण आत्मा शंभु याचे व मी स्फुरणाचे स्वाभाविकच ऐक्य असल्यामुळे, मी म्हणून आपले स्वतंत्र अस्तित्व व वस्तुत्व वागविलेच गेले नसेल तर शंभूला अहंसमर्पण करण्याचा किंवा शंभूचे व अहंचे ऐक्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही व

अहं देऊनि शंभू । शांभवी झालों ।

या माऊलीच्या म्हणण्याची संगती लागत नाही.

अर्जुनपण न घेता । मी ऐसे जे पांडुसूता ।
उठे ते तत्वता । तयाचे रूप ।

या ज्ञानेश्वरीतील ओवीत अहंस्फुरणाचे आपण देहाशी ऐक्य करून राहतो म्हणूनच

देहाचे अहंपण सोडले असता मी स्फुरण हे परमेश्वराचेच स्वरूप (लेख.०४-पा.२७०) होते असे माऊलींनी म्हटले आहे. अर्थात अहंस्फुरणाचे व देहाचे ऐक्य असणे ही जी जीवदशा आहे ती स्वीकारूनच,

अहं देऊनी शंभु । शांभवी झालो ।

हे माऊलीचे उद्‌गार आहेत यात संशय नाही.

दुसऱ्या प्रकरणात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीगुरूचा महिमा वर्णन केला आहे व श्रीगुरूचे निवृत्ति हे नावरूप,

ऐसे करणियाविण । स्वयंभचि जे निवृत्तिपण ।

स्वयंभू आहे, जन्य नाही कारण ते पूर्णब्रह्म आहेत असे प्रतिपादून माऊली म्हणते की या श्रीगुरूवंदनाने मी चारी वाणीचे ऋण फेडिले.

तिसऱ्या प्रकरणात वाणीच्या ऋणाचा विचार त्यांनी केला आहे. जीवाची जीवदशा त्याच्या वाणीवर सारखी रूळत असते - म्हणजे जीव आपली जीवदशा जागृती, स्वप्न, सुषुप्ती या कोणत्याही अवस्थेत कधी विसरत नाही. तो ती मनात वागवितो व बोलूनही दाखवितो. ही जीवदशा किंवा अज्ञानदशा जीवात्म्याची झोप होय. पुढे वेदान्त विचाराने याच वाणीच्या साह्याने जीव हा आपली जीवदशारूपी झोप नाहीशी करितो. ही जीवात्म्याची ज्ञानदशा होय. ही ज्ञानदशाही जीवात्मा, मी ब्रह्म आहे असा बोध वाणीवर वागवूनच सांभाळतो. पण जीव आपल्याला जीव किंवा अज्ञानी समजत असला तरी त्याची मूळची शुद्ध आत्मस्थिती कायमच असते. ती अविनाशी असल्यामुळे यत्किंचितही नाहीशी होत नाही. मी अज्ञानी आहे अशी जीव आपल्याविषयी कल्पना करितो तेव्हा त्याचे ज्ञानस्वरूप नाहीसे होते असे नाही किंवा मी आता ज्ञानी झालो किंवा ब्रह्म आहे असे जीव जेव्हा म्हणतो तेव्हा तो ब्रह्म होतो, पूर्वी नसतो असेही नाही. तो सदासर्वदा सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपच असतो. जीवस्वरूप केव्हाच नसतो, म्हणून जीवात्म्याने मी अज्ञानी आहे किंवा ज्ञानी आहे, ब्रह्म आहे, असे म्हणणे किंवा वाणीच्या साह्याने तसे चिंतन करणे, हे दोन्ही प्रकार भ्रमाचेच ठरतात. मी अज्ञानी आहे असे समजणे हा जसा बंध आहे तसेच मी ब्रह्म झालो असे समजणे हाही बंधच होतो. कारण तिन्ही बंधरहित ब्रह्मस्वरूप असलेल्या आत्म्याने मी ब्रह्म झालो असे समजणे म्हणजे पूर्वी तो बद्ध होता असे म्हणण्यासारखे होते. मी ब्रह्म आहे म्हणण्यात किंवा वाटण्यात जे वाणीचे साह्य घेतले जाते व मी पूर्वी बद्ध होतो असे म्हणण्याचा किंवा वाटण्याचा जो भास उरतो तो अज्ञानाचा किंवा भ्रमाचा शेष होय. यालाच आचार्य वेदान्तात अविद्यालेश म्हणतात. अर्थात हा अविद्यालेश मी ब्रह्म आहे असे स्फुरते तोपर्यंत राहतो.

अमृतानुभवाचे वैशिष्ट्य

पुष्कळसे वेदान्ती हा अविद्यालेश ज्ञान्याचा देहपात झाला असता नाहीसा होतो असे म्हणतात. पण श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

ते ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनिया ।
ते पाया पडोनि मिया । सोडविले ।

हे ऋणशेष नुसते देहपात झाल्याने सुटत नाही, म्हणून मी श्रीगुरूच्या पाया पडून म्हणजे ज्ञानोत्तरही श्रीगुरूची भक्ती करून ते वाचाऋण सोडविले. येथे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ''मिया सोडविले'' असे म्हणून स्वतःचे ठिकाणी अविद्यालेश मानला असल्यामुळे, श्रीज्ञानेश्वरमहाराज अमृतानुभवग्रंथात जीव, अज्ञान, अज्ञानभूमिका काहीही मानीत नाहीत असा वाद घालणाऱ्याच्या वादाचा फोलपणा सहज दिसून येतो. ज्ञानोत्तर भक्तीवाचून वाचाऋण सुटून किंवा ''अहंब्रह्मास्मि'' या वृत्तिज्ञानाचा लय होऊन निर्विकल्प, अखंड प्रेमरूप सहाजावस्था प्राप्त होणे शक्य नाही, असे जे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे म्हणणे किंवा प्रतिपादन तेच अनुभवामृतग्रंथाचे खरे सार आहे व इतर सर्व वेदान्तग्रंथाहून वैशिष्ट्य होय.

स्वमताची सिद्धी

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी पुढील प्रकरणात हेच आपले म्हणणे कसे सिद्ध होते, हे दाखविले आहे व ते दाखविताना त्यानी पुढील उपपत्ती दिली आहे. ''अहंब्रह्मास्मि'' या ज्ञानानंतर ''ज्ञान अभेदें वावरे'' ज्ञान व्यापक होत जाऊन पुढे ''सर्व ब्रह्म'' असे ज्ञान झाले तरी 'सर्वब्रह्म' हेही वृत्तिज्ञानच असते; म्हणून 'सर्व ब्रह्म' या व्यापक ज्ञानातही स्वाभाविक जी निर्विकल्प अनिर्वाच्य अवस्था ती प्राप्त होत नाही किंवा बाणत नाही.

येरवी सच्चिदानंदभेदे । चालिली तिन्ही पदे ।
परी तिन्ही उणी आनंदे । केली येणें ॥

वृत्ति स्फुरते किंवा जाणली जाते तोपर्यंत अहंब्रह्मस्मि किंवा सर्वब्रह्म हे ज्ञान

स्फुरतेच व तोपर्यंत सत्‌चित्‌आनंद असा आत्मस्वरूपाचे ठिकाणी धर्मभेद भासून अखंडसुखरूप किंवा अखंड आनंदरूप स्थिति येत नाही. पण प्रेमवृत्तीने प्रेम जर वाढविले तर ज्ञानवृत्ती प्रेमात लीन होऊन जाते व अनायासे अनिर्वाच्य निर्विकल्पता शेष राहते.

प्रेमांश वाढविण्याचा उपाय

अहं ब्रह्मास्मि वगैरे ज्ञानवृत्तीचा विषय नामरूपहित निर्गुणब्रह्म असते व प्रेमवृत्तीचा विषय नामरूपसहित साकार ब्रह्म असते हे सर्व संताना मान्य आहे. नामरूपरहित ब्रह्म म्हणजे सत्तामात्र ब्रह्म होय. म्हणून नाथांनी ''सत्पद ते ब्रह्म'' असे निर्गुणाचे वर्णन केले आहे.

आनंदपदी जया म्हणती हरी ।

सगुण ब्रह्माला आनंदस्वरूप नाथांनी म्हटले आहे, म्हणजे सगुणाचे प्रेम केले असता त्या सगुण प्रेमात अहंब्रह्मास्मि वगैरे ज्ञानवृत्ति मुरते असा नाथांचा भाव आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीही अनुभवामृताच्या पांचव्या प्रकरणात असेच प्रतिपादिले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, जोपर्यंत आपण कापूर वगैरे पदार्थ वृत्तीने पाहतो म्हणजे त्याचे ज्ञान करून घेतो तोपर्यंत त्या पदार्थाचे एका एका धर्माचेद्वारा ज्ञान होते पण पदार्थाचे सर्व धर्म एकवटून घ्यावयाचे असल्यास त्या साकार पदार्थालाच घेतले पाहिजे. त्याचा अर्थ असा की सगुण साकार श्रीहरीच्या प्रेमभक्तीने ज्ञानाची जाणीव मुरते व निर्विकल्प अनिर्वाच्यस्थिती प्राप्त होते. श्रीसमर्थ रामदासांनीही,

ती जाणीव जेथे विराली । तेथे अनिर्वाच्यता बोलिली ।।(व्यतिरेक समास ८)

जाणीव विरली असता अनिर्वाच्य स्थिती प्राप्त होते असे म्हटले आहे. आता उपाधिरहित झालेल्या ज्ञान्याने सगुणसाकाराची ज्ञानोत्तर भक्ति करावयाची तर तो सगुणसाकार निरुपाधिक असायला पाहिजे यांत शंका नाही. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सगुणसाकार हा त्रिगुणात्मक, अज्ञानजन्य असतो असा जो व्यतिरेक ज्ञानी व अज्ञानी लोकांचा समज, त्याचे निरसन करण्याकरिता पुढे सहाव्या - सातव्या प्रकरणात अज्ञानाचे खंडन करून अज्ञान मुळीच नाही हे सिद्ध केले आहे. अज्ञानच सिद्ध झाले नाही तर अज्ञान ही उपाधी राहत नाही व सगुणही अज्ञानरहित म्हणजे निरुपाधिक सिद्ध होते.

सगुणसाकार श्रीहरीचे निरुपाधिकत्व

अनुभव, प्रमाण व युक्ती यांच्या साह्याने अज्ञान म्हणून काही वस्तु आहे काय याचा विचार करीत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी असे ठरविले की,

एवं कवणेही परी । अज्ञानभावाची उजरी ।
न पडेचि नगरी । विचाराचिये ।।

अज्ञान ही वस्तुच नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अज्ञान मुळीच नाही हे सिद्ध करण्याकरिता दिलेल्या उपपत्त्या शंकराचार्यांच्या वेदान्तातही दिल्या आहेत.

ब्रह्मण्यध्यस्तमायादिनिवृत्तिं कुरुते तु सा । विद्या यदि न मायाया :
प्रत्यगात्मन्यसंभवात् ।

परब्रह्माच्या ठिकाणी भासणाऱ्या माया वगैरेची विद्या निवृत्ति करिते असे म्हणावे तर तसे म्हणता येत नाही, कारण आत्म्याचे ठिकाणी मायाच संभवत नाही.

प्रत्यगात्मा परंज्योतिर्माया सा तु महत्तमः ।
तथा सति कथं मायासंभवः प्रत्यगात्मनि ।।

आत्मा अखंड प्रकाशस्वरूप आहे व माया ही मोठा अंधःकार होय. असे असल्यामुळे प्रकाशरूप आत्म्याचे ठिकाणी अंधकाररूप माया कशी संभवेल?

तस्मात्तर्कप्रमाणाभ्यां स्वानुभूत्या च चिद्घने ।
स्वप्रकाशैकसंसिद्धेर्नास्ति माया परात्मनि ।।

म्हणून युक्ति, प्रमाण व अनुभव यापैकी कशानेही स्वयंप्रकाशरूप आत्म्याचे ठिकाणी मायेची सिद्धी होत नाही. वस्तुतः ज्ञानदृष्टीने मायेची सिद्धि होत नाही. **''मायेति अविद्यामानस्य आख्या''** वंध्यापुत्र नावाप्रमाणे माया हे नामही अस्तित्वांत नसलेल्या पदार्थाचे आहे असे आचार्यही म्हणतात. विचार करून पाहता माया म्हणून काही अस्तित्वातच पदार्थ नाही तर ती उपाधी तरी कशी होणार? व त्या अस्तित्वात नसलेल्या मायेचे योगाने ब्रह्म औपाधिक किंवा मायिक तरी कसे होणार? नावरूपे हीच मायाशक्ति होय. विचार न करणाऱ्याला ती, ती स्वतंत्र वस्तु आहे असे भासवून नामरूपात्मक सगुण मायिक आहे असा भ्रम उत्पन्न करिते व विचार करणाऱ्याला ती समोरच दिसत नाही. म्हणून त्याला सर्व नामरूपात्मक सगुणसाकार निरुपाधिकच वाटतो हे श्रीअमृतानुभवातील पहिल्या प्रकरणात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी दाखविले आहे. परमप्रेमास्पद आत्मा आपलेच प्रेम करण्याकरिता प्रेमवृत्तीने स्फुरतो व नामरुपात्मक होतो. असे करण्यामध्ये सहजच

दोनपणामुळे आत्म्याला साकारत्त्व येते. आत्मस्वरूप एकसारखे अत्यंत एकरूप राहात नाही ते दोनपणाने स्फुरते; तेव्हा आत्मा व प्रेमवृत्ती दोघेही साकार होतात. (अमृतानुभव प्र. १ ओ. २ ते ४), अशा साकाराला भौतिक साकार म्हणत नाहीत. देशकालवस्तु परिच्छेदाने मर्यादित साकाराला भौतिक साकार म्हणतात. श्रीहरीचा साकारपणा निराकाराला सोडून नसतो व त्याचा सगुणपणा निर्गुणपणाला सोडून नसतो. म्हणूनच साकारसगुण रूपानेही भगवान् व्यापक असतो, हे अर्जुनाला दाखविलेल्या विश्वरूपावरून व ब्रह्मदेवाला वस्तुमात्र श्रीकृष्णस्वरूप दाखविल्यावरून स्पष्ट आहे.

सारांश, ज्ञानदृष्टीने जेथे पूर्वीच मायिक सगुणदेखील निरुपाधिक होऊन जाते तेथे नित्य अमायिक परमात्म्याचे साकार स्वरूप कसे औपाधिक राहणार? म्हणून ज्ञानानंतर सगुण श्रीहरीची भक्ति संभवते व श्रीज्ञानेश्वरमहाराजादी मोठमोठ्या ज्ञानी संतांनी ती केली आहे, व त्यांनी प्रवृत्त केलेल्या भक्तीचा प्रवाह अजून खंडित झाला नसून तो सारखा वाहतच आहे. दरवर्षी आळंदी ते पंढरपूर त्या प्रेमभक्तीचा सोहळा आपल्याला पहायला मिळतो.

ooo